स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शोध प्रबंधाचा पूर्व आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव विज्ञानशाखे अंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच.डी.पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा पूर्व आराखडा

-: संशोधन विषय :-

भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास-विशेष संदर्भ मराठवाडा विभाग

संशोधक

रामगिरवार शशिकांत चंद्रकांतराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. तरोडे विजय लक्ष्मण

सहा. प्राध्यापक

लोकप्रशासन विभाग,

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड.

संशोधन केंद्र

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड.

सप्टेंबर -2023

भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास- विशेष संदर्भ मराठवाडा विभाग

❖ **प्रस्तावना:**

प्रत्येक मनूष्याला जन्मत:च भीतीची जाणीव असते. वाढत्या वयाबरोबर आणि विचारांच्या प्रगल्भतेने मानवाला ही भीतीची आणि असूरक्षीततेची जाणीव अस्वस्थ करते. त्यामूळे मानव कायम सूरक्षीततेच्या शोधात असतो, यातूनच मानवाची उत्क्रांती आणि विकास घडून आलेला आहे. सूरक्षीतता प्राप्त करण्याच्या धडपडीतूनच प्रत्येक व्यक्ती कार्यप्रवण होत असते. आपण आणि आपल्या जवळच्या व्यक्ती, आपले नातेवाईक, आप्तेष्ट सूखी आणि सूरक्षीत असाव्यात, त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थीक संकटांचा त्रास होऊ नये यासाठी प्रत्येक व्यक्तीची जीवनात धडपड सुरु असते. अशी सूरक्षीतता प्राप्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपआपल्या परीने योजना आखीत असते, नियोजन करीत असतो.

मानवाचे दैनंदीन आयूष्य हे संकटांनी भरलेले असते. कोणते संकट केंव्हा येईल हे निश्चीतपणे सांगता येत नाही. भूकंप, पूर, त्सूनामी, वादळे, ज्वालामूखी इ. नैसर्गीक संकटांबद्दल अंदाज व्यक्त करता येत नाही, तसेच चोरी, लूटालूट, दंगल, अपघात, स्फोट, अतिरेकी हल्ला इ. मानवी आपत्तींबद्दल देखील अंदाज वर्तविता येत नाही. परंतू या आपत्तीमूळे मानवी जीवनावर अत्यंत दूरगामी परीणाम होताना दिसून येतात. अशा प्रकारच्या नैसर्गिक व मानवी आपत्तीमधून स्वत:ला व स्वत:बरोबरच इतरांना सूरक्षीतता प्रदान करण्याच्या उद्देशाने 'विमा' या संकल्पनेचा जन्म झाला आहे. सामाजीक सहकार्याचा उत्कृष्ट आविष्कार म्हणून विम्याकडे पाहिले जाते. अचानक आलेल्या संकटांमूळे ज्या व्यक्तीचे प्रत्यक्ष नूकसान होईल , त्याच्या झालेल्या नूकसानीची भरपाई विम्यातून जमा केलेल्या निधीतून करण्यात येईल व संबंधीत व्यक्तीची आर्थीक स्थीती फार खालावणार नाही याची हमी तसेच दक्षता ही ‘विमा’ या संकल्पनेद्वारे घेण्यात आली.

❖ आयूर्विमा संकल्पनेचा ऐतीहासिक संदर्भ:-

‘विमा’ या संकल्पनेचा उगम चार हजार वर्षापूर्वी बॅबीलोन संस्कृतीत झालेला आढळून येतो. ग्रीक तसेच रोमन साम्राज्यात देखील आयूर्विमा अस्तीत्वात असल्याचे दाखले मिळतात. समूद्री व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी सर्वप्रथम विमा ही संकल्पना शोधून काढली. भारतीय संस्कृतीत देखील ऋग्वेदामध्ये ‘योगक्षेम’ या शब्दप्रयोगाद्वारे विमा व्यवसायाच्या अस्तीत्वाची जाणीव होते. औद्योगीक क्रांतीनंतर मानवाचे जीवन अतीशय गतीमान झाले आणि विमा या संकल्पनेचा आणि व्यावसायाचा विकास घडून आला. इ.स. 1347 मध्ये स्वीकारलेल्या समूद्री विमा पॉलीसीचा अभीलेख इटली या देशात उपलब्ध असून पहीली व्यक्तीगत विमा पॉलीसी इ.स. 1583 मध्ये इंग्लंड येथे विल्यम गिबन्स (William Gybbons) यांनी स्वीकारल्याची माहीती मिळते, जीचा कालावधी एक वर्षे होता.

जगामधल्या व्यापाराच्या कक्षा जसजशा वाढत गेल्या तसतशी त्यामधली अनिश्चीतता व धोके देखील वाढत गेले आणि विमा या संकल्पनेच्या कक्षा देखील वाढत जावून आधूनिक विमा व्यवसाय अस्तीत्वात आला. आधूनिक भारतात इ.स. 1818 साली श्री सोहराबजी मोदी या एका खाजगी व्यापारी व्यक्तीने कलकत्ता येथे भारतातील विमा व्यावसायाची मूहूर्तमेढ रोवली. त्यांनी ‘आनंद कंपनी’ यानावाने विमा कंपनी सुरु केली. त्यानंतर मूंबई आणि मद्रास येथे देखील अनेक विमा कंपन्या अनेकांनी सुरु केल्या. पूढे. इ.स. 1956 मध्ये इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले, त्यानंतरच्या दोन-तीन वर्षात आनंद कंपनी व तेंव्हा अस्तीत्वात असलेल्या इतर 245 विमा कंपन्यांचे देखील एकत्रीकरण करुन 1956 च्या एल.आय.सी. ॲक्टद्वारे भारतीय आयूर्विमा महामंडळ या विमा कंपनीची 1 सप्टेंबर 1956 मध्ये स्थापना करण्यात आली.

❖ **संशोधन विषयक समस्या सूत्रण:-**

भारत सरकारने इ.स. 1956 च्या कायद्याने खाजगी क्षेत्रात कार्यरत असलेल्या 245 विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले. सहाजीकच त्यामूळे भारतातील विमा क्षेत्र सूसंघटीत होवून भारतीय आयूर्विमा महामंडळ या एकाच छताखाली आले. पूढे इ.स. 1990 च्या दशकात खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरणाच्या प्रक्रीयेत पून्हा विमा क्षेत्र खाजगी व विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यासाठी खूले केले. आज या क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली असून त्या स्पर्धेत भारतीय आयूर्विमा महामंडळ नेमक्या कोणत्या भूमीकेतून कार्य करीत आहे, याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जागतीकीकरणाच्या यूगात भारतीय आयूर्विमा महामंडळ नागरीकांसाठी कोणकोणत्या प्रकारच्या विमा योजना राबवीत आहे, आयूर्विमा महामंडळात हजारो अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहेत. ते कशापद्धतीने प्रशासकीय कामकाज करतात, त्यांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो. देशांतील जनतेचे हजारो कोटी रुपये भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या योजनांमध्ये विम्याच्या स्वरुपात गूंतवलेले आहेत. त्या पैश्यांचा उपयोग, विनीयोग, वापर व सूरक्षीतता या सर्व बाबींचे व्यवस्थापन कशा पद्धतीने होते.

इतर देशांच्या तूलनेत भारतात विमा क्षेत्रांबद्दल म्हणावी तशी जागरुकता दिसून येत नाही. इ.स. 2011 च्या जनगणना अहवालानूसार भारतात आयूर्विमा पॉलीसी घेणाऱ्यांचे प्रमाण फक्त 13 टक्के आहे. याची विवीध कारणे आहेत. आजही आपल्या देशात विमा पॉलीसी घेणे म्हणजेच भारतीय आयूर्विमा महामंडळाच्याच विमा योजनांमध्ये सहभागी होणे समजले जाते. तसेच विमा योजनांकडे सूरक्षीततेच्या दृष्टीने न पाहता केवळ गूंतवणूकीचे साधन म्हणून किंवा आयकर (Income Tax) वाचवीण्याचे साधन म्हणून पाहीले जाते. भारतीय आयूर्विमा महामंडळ स्थापन होवून जवळपास 67 वर्षांचा कालावधी झाला आहे. या काळात विवीध कायदे, नियम, अधिनीयम इ.चा परीणाम देखील त्यांच्या प्रशासनावर व

कार्यपद्धतीवर पडला आहे. भारतीय आयूर्विमा महामंडळापूढे देखील अनेक समस्या आहेत. उदा. भ्रष्टाचार अकार्यक्षमता, दप्तरदिरंगाई, अधीकारी व कर्मचाऱ्यांची गैरहजेरी, विमा अभीकर्ता (एजंट) चे गैरवर्तन, खाजगी कंपन्यांचे आगमन, तालूका व ग्रामपातळीवर न झालेला विस्तार, प्रशीक्षणाचा अभाव इ. म्हणून प्रस्तूत संशोधनासाठी महाराष्ट्रातील मराठवाडा भौगोलीक विभाग निवडून मराठवाड्यात भारतीय आयूर्विमा महामंडळाचे प्रशासकीय कार्य कसे चालते, त्यांची प्रशासकीय व वैधानीक रचना व कार्यपद्धती, विवीध विमा योजना, त्यांना येणाऱ्या अडचणी व समस्या समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन अधीक सूक्ष्म व वस्तूनिष्ठ व्हावे म्हणून **"भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास- विशेष संदर्भ मराठवाडा विभाग"** या विषयातंर्गत नांदेड जिल्ह्याचा विशेष अभ्यास केला जाणार आहे. नांदेड जिल्ह्यात महामंडळाचे एक विभागीय कार्यालय, दोन शाखा कार्यालये, तसेच दोन सॅटेलाईट कार्यालये कार्यरत असून त्यांचे प्रशासन व कार्यपद्धती अधीक प्रभावी करण्यासाठी कोणते उपाय आवश्यक आहेत? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न **भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास- विशेष संदर्भ मराठवाडा विभाग** या शोध प्रबंधाद्वारे केला जाणार आहे.

❖ **संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

""**भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास- विशेष संदर्भ मराठवाडा विभाग"** या संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी खालील उद्दीष्ट्ये ठरवीण्यात आली आहेत."

1) भारतीय आयूर्विमा महामंडळाचे संघटन व प्रशासनाचा अभ्यास करणे.
2) मराठवाड्यातील भारतीय आयूर्विमा महामंडळाची प्रशासकीय कार्यपद्धती जाणून घेणे.
3) भारतीय आयूर्विमा महामंडळामार्फत कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विवीध योजनांची व कार्यक्रमांची माहीती करुन घेणे.
4) भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या विवीध योजना व कार्यक्रमांची माहीती नागरीकांपर्यंत पोहोचते का ? त्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना येणाऱ्या समस्यांचा आढावा घेणे.
5) भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधीकारी व कर्मचारी यांना विमा योजनांच्या अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या विवीध समस्या जाणून घेणे.
6) भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेणे.

❖ संशोधनाची गृहीतकृत्ये:-

गृहीतकृत्यास संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन विषयाच्या अनूषंगाने मांडलेल्या गृहीतकृत्यामूळे संशोधन कार्यास योग्य दिशा व चालना मिळून अर्थपूर्णता येते. संशोधनात गृहीतकृत्याचे महत्व विचारात घेऊन प्रस्तूत संशोधनासाठी पूढील गृहीतकृत्ये मांडण्यात आली आहेत.

1) भारतीय आयूर्विमा महामंडळ आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवुन सर्वसामान्य नागरीकांना विमा सेवा देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते.
2) भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गाची भूमिका ग्राहकोपयोगी सेवा देण्यामध्ये महत्त्वपूर्ण दिसते.
3) भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या सामान्य कर्मचाऱ्यांद्वारे देखील घेतला जातो.
4) भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या विविध योजनांबाबत जनजागृती तसेच जागरुकता निर्माण करण्यामध्ये अधिकारी व कर्मचारी महत्वाचे ठरतात.
5) भारतीय आयुर्विमा महामंळातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाचे व सहकार्याचे संबंध दिसतात.

❖ संशोधन पद्धती व तथ्य संकलन:-

प्रस्तूत शोध प्रबंधासाठी संशोधन करताना, 1) सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धत, 2) वर्णनात्मक संशोधन पद्धत 3) विश्लेषणात्मक संशोधन पद्धत इ पद्धतींचा उपयोग करण्यात येईल.

1) सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धत:-

सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा मूख्य उद्देश्य हा एखाद्या सामाजीक समस्येच्या बाबतीत महत्वपूर्ण तथ्य संकलीत करणे हा असतो. त्या दृष्टीने भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधीकारी व कर्मचारी यांच्यापूढील समस्या व त्यावरील संभाव्य उपाययोजना जाणून घेण्यासाठी सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

2) वर्णनात्मक संशोधन पद्धत :-

वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा मूख्य उद्देश हा एखाद्या सामाजीक समस्येचे वर्णन करुन त्याबद्दल समाजात जाणीव जागृती विकसीत करण्याचा असतो. त्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनात विमा क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे वर्णन करुन सामाजीक क्षेत्रात त्यांच्या अडचणी व समस्यांबद्दल जनजागृती घडवून आणण्यासाठी या पद्धतीचा वापर करण्यात येईल.

3) विश्लेषणात्मक संशोधन पद्धत :-

प्रस्तूत संशोधनाकरीता जे तथ्य संकलन केले जाईल, त्यातून निघणाऱ्या निष्कर्षांचे विश्लेषण करुन विमा क्षेत्रातील कार्यपरीस्थिती अधीक चांगली बनवीण्याच्या दृष्टीने उपाययोजना सूचवीण्यात येतील. या उपाययोजनांचा फायदा

केवळ विमाक्षेत्रातील कर्मचारी व अधीकाऱ्यांनाच नाही तर संपूर्ण कर्मचारी प्रशासनाला होईल.

1) प्राथमिक स्त्रोत :-

'संशोधकाने प्रथम प्रयत्नातून किंवा अध्ययनातून प्राप्त केलेल्या तथ्यांना प्राथमिक तथ्य असे म्हणतात आणि त्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला जातो त्यांना प्राथमिक पद्धती किंवा स्त्रोत असे म्हणतात, म्हणून प्रस्तूत संशोधनासाठी भारतीय आयूर्विमा महामंडळ विभागीय, शाखा व सॅटेलाईट कार्यालय जिल्हा शाखा अंतर्गत काम करणारे विवीध अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विमा प्रशासन व विमा योजना राबविण्यासबंधी समस्यांची माहीती जाणून घेण्याच्या दृष्टीने मुलाखत अनुसूची, प्रत्यक्ष निरीक्षण, शासकीय अहवाल इ. साधनांचा अवलंब करण्यात येईल.

2) द्वितीय स्त्रोत:-

जी तथ्ये स्वत: संशोधकांची नसून इतर व्यक्ती किंवा संस्था यांच्याद्वारे संकलीत केली जातात आणि ती त्यांच्या मालकीची असतात त्यांना द्वितीयक तथ्ये किंवा द्वितीयक सामग्री असे म्हणतात. म्हणून प्रस्तूत संशोधनाकरीता तथ्य संकलन करण्यासाठी विवीध संदर्भ ग्रंथ, लेख, प्रकाशीत व अप्रकाशीत शोधप्रबंध, ज्ञानकोश, शब्दकोश, भारतीय आयूर्विमा महामंडळाचे मासीक व वार्षीक अहवाल, शासन निर्णय,जनगणना अहवाल, साप्ताहीके, मासीके, त्रैमासीके, दैनीक वर्तमानपत्रे, भारतीय आयूर्विमा महामंडळ व भारतीय विमा नियामक प्राधीकरण यांचे संकेतस्थळ, आंतरजाल, भारतीय आयूर्विमा महामंडळ व विमा संस्थाद्वारे प्रसीद्ध होणारी माहीती पूस्तीका, इंटरनेट इ. स्त्रोतांमधून माहीती संकलीत केली जाईल.

❖ **संशोधन कार्याची मांडणी:-**

संशोधनाच्या प्रारंभापासून ते संशोधनाचे लिखाण संपेपर्यंतचा अहवाल लिहिल्यशिवाय संशोधन कार्य पूर्ण होत नाही. संशोधन अहवाल लेखन तयार करणे हा संशोधन प्रक्रयेतील अंतीम व शेवटचा टप्पा आहे. संशोधन अहवाल लेखन हे एक तंत्र आहे. प्रस्तूत संशोधन अहवालाची योग्य पद्धतीने व सूत्रबद्धरित्या मांडणी करण्यासाठी सहा प्रकरणांमध्ये सदरील संशोधन कार्य हे विभागण्यात आले आहे.

1) प्रकरण पहिले – प्रस्तावना

पहिल्या प्रकरणात विमा प्रशासन विषयात प्रवेश करण्याचा हेतू, विमा प्रशासनाचा इतिहास व विकास विमा प्रशासनाचा अर्थ, स्वरुप, व्याप्ती व महत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न, संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचे महत्व, पूर्व संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहीतकृत्ये, तथ्य संकलन,

नमूना निवड व शेवटी शोध प्रबंधाचा आराखडा यासंबंधीचा अभ्यास करण्यात येईल.

2) प्रकरण दुसरे – भारत सरकार आणि विमा क्षेत्र

प्रस्तूत प्रकरणामध्ये भारतीय आयूर्विमा महामंडळाचा विकास, त्यांची कार्यपद्धती,त्यांच्यासाठी असलेल्या कायदेशीर तरतूदी, विमा क्षेत्रासाठी भारत सरकारने निर्माण केलेले विवीध अधिनियम, त्या अधिनियमांचा विमा क्षेत्रावर झालेला परीणाम, विमा कंपन्यांची नोंदणी व त्यांचे व्यवस्थापन, विमा दाव्यांचा किंवा प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यपद्धती, विमा क्षेत्रात होत असलेला माहिती व तंत्रज्ञानाचा वापर, विमा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण, विमा क्षेत्राचे खाजगीकरण, विमा कार्यक्षेत्रातील कार्यरत विमा लोकपाल या संबंधीचा अभ्यास करण्यात येईल.

3) प्रकरण तिसरे – विमा व विम्याचे वर्गीकरण

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण असलेल्या विमा व विम्याच्या विवीध प्रकारांचे विश्लेषण करण्यात येईल. त्यामध्ये भारतीय आयूर्विमा महामंडळामार्फत ज्या विवीध विमा योजना राबविल्या जातात, त्यांचे ढोबळ मानाने विविध प्रकारांमध्ये वर्गीकरण करुन, त्या विवीध प्रकारांमध्ये असलेला सूक्ष्म फरक व त्यांचे विवीध प्रकार यांचा अभ्यास करण्यात येईल.

4) प्रकरण चौथे – भारतीय आयूर्विमा महामंडळ प्रशासनाचे संघटन व कार्यपद्धती –

प्रस्तूत प्रकरण हे सर्वेक्षणावर आधारीत असून या प्रकरणामध्ये भारतीय आयूर्विमा महामंडळाचे राष्ट्रीय पातळीवरील , राज्य पातळीवरील, विभाग व जिल्हा तसेच तालूका पातळीवरील प्रशासकीय संघटन, प्रशासनाची रचना, अधिकारपदपरंपरा, प्रशासकीय कार्यपद्धती, महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा प्रादेशिक विभागाची भौगोलीक स्थीती, लोकसंख्या, नागरी व ग्रामीण जिवन, साक्षरतेचे प्रमाण, एकूण लोकसंख्येतील विमाधारकांचे प्रमाण, भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या विमा योजनांमध्ये सहभागी होणाऱ्यांचे प्रमाण, तसेच मराठवाड्यातील भारतीय आयूर्विमा महामंडळाची जिल्हा पातळीवरील कार्यालये, नांदेड शहरातील विभागीय कार्यालये, शाखा कार्यालय व सॅटेलाईट कार्यालय यांचे संघटन, रचना व कार्यपद्धती समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

5) प्रकरण पाचवे – भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधिकारी व कर्मचारी वर्गापुढील समस्या

प्रस्तूत प्रकरण देखील सर्वेक्षणावर आधारीत असुन या प्रकरणामध्ये भारतीय आयूर्विमा महामंडळापूढील तसेच एकंदर विमा क्षेत्रापूढील विवीध अडचणी व समस्या जसे जनसहभागाचा अभाव, भ्रष्टाचार , अकार्यक्षमता, दप्तरदिरंगाई, अधिकारी व कर्मचारी वर्गाचा हलगर्जीपणा, विमा एजंटाचे गैरवर्तन, खाजगी कंपन्यांचे आगमन, फसवणूकीचे दावे, तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) विम्याचा दावा, प्रशीक्षणाचा अभाव, तालूका व ग्राम पातळीवर न झालेला कार्यालयांचा विस्तार इ.विवीध समस्यांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना सूचविण्यासाठी

भारतीय आयूर्विमा महामंडळातील अधीकारी व कर्मचाऱ्यांकडून तसेच विमा अभीकर्ता व नांदेड शहरातील नागरिकांकडून मुलाखत अनुसूची, निरीक्षण व प्रत्यक्ष मूलाखतीद्वारे जी माहीती घेण्यात येईल तिचे विश्लेषण व मूल्यमापन करण्यात येईल.

6) प्रकरण सहावे – निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तूत प्रकरण सहा हे शोध प्रबंधातील अंतीम प्रकरण असून या प्रकरणात संशोधकाने अध्ययनासाठी निश्चीत केलेल्या गृहीतकृत्यांची पडताळणी केली जाईल.

याच प्रकरणाच्या उत्तरार्धामध्ये संशोधकाने संशोधनातून प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे मराठवाडयातील भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांपूढील समस्या दूर करण्यासाठी तसेच विमा सेवांचा दर्जा सूधारावा व सर्वसामान्य नागरीकांपर्यत भारतीय आयूर्विमा महामंडळाच्या विमा विषयक सूविधा प्रभावीपणे पोहचाव्यात व नागरीकांमधील विमा विषयक अज्ञान दूर करुन त्यांच्यात विमा जागृती येण्यासाठी काय करणे आवश्यक आहे. या अनूषंगाने काही शिफारशी देखील सूचवीण्यात येतील.

❖ संदर्भग्रंथ सूची :-

1) जैन तेजकूमार, सक्सेना सूनिल कूमार (1989), लोकउद्योग प्रशासनीक परिप्रेक्ष्य, प्रींटवेल पब्लीशर्स, जयपूर.
2) खैरनार दिलीप, (2009) 'प्रगत सामाजीक संशोधन पद्धती व सांख्यीकी', डायमंड पब्लीकेशन, पूणे.
3) आगलावे प्रदीप (2022) 'सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4) करे, बिभीषण,(जूलै-2015), सामाजिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या बूक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.
5) श्री. मू. देसाई सौ. निर्मल भालेराव, (जानेवारी-2014) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.
6) सी.जे.जोशी, मानकर सूधाकर, (सप्टेंबर-2010) विमाशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
7) कानेटकर, मेधा, (फेब्रुवारी-2007) विमाशास्त्र तत्व आणि व्यवहार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
8) बिडवे अनिरुद्ध, (जून-2001) विमाशास्त्र, कैलाश पब्लकेशन्स, औरंगाबाद.
9) उदगीरकर, भूरके व इतर, (2011), विम्यातील आधूनिक प्रवाह, साधना पब्लीकेशन्स, परभणी.
10) सराफ मोहन (1978), विमाशास्त्र, सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई.
11) कूलकर्णी विनायक, (ऑक्टोंबर-2009) विम्याचे वरदान, फूलराणी प्रकाशन, मुंबई.
12) श्रीवास्तव बालचंद, (2004), बीमा के तत्व, साहीत्य भवन पब्लीकेशन्स, आगरा.

13) Bhigania Roshan Kumar,(2010) Fundamentals of Insurance, Sharda Prakashan, Thane.
14) Mishra M.N,Mishra S.B., Insurance Principles and Practice (2009), S chand & Company Ltd., New Delhi.
15) Sharma N.K., (2012), Insurance Theory & Practice, DND Publications, Jaipur.
16) Gupta P.K.,(2010), Insurance and Risk Management, Himalaya Publishing House, Mumbai.
17) Datt Gaurav, Sundaram K.P.M., Mahajan Ashwini, (2022) Indian Economy, S. Chand & Company Pvt., Ltd., New Delhi.
18) Haridas R., (2011) Life Insurance in India, New Century Publications, New Delhi.
19) Uppal R.K.,(2008), Dictionary of Insurance, New Century Publications, New Delhi.

वेबसाईटस्

1) www.licindia.com
2) www.irdaindia.org
3) www.policybazar.com
4) www.sbilife.com
5) www.bajajallianz.com
6) www.iciciprulife.com

संशोधक	मार्गदर्शक
रामगिरवार शशिकांत चंद्रकांतराव	डॉ. तरोडे विजय लक्ष्मण